# साद देती नगरच्या आठवणी !

जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरियसि ।

जननी आणि जन्मभूमी यांचे श्रेष्ठत्व आणि महत्त्व स्वर्गापेक्षा महान आहे, थोर आहे, अनन्य साधारण आहे – ऐतिहासिक दृष्ट्या प्राचीनतेचा वारसा असणारे ‘अहमदनगर’ ही माझी जन्मभूमी, मातृभूमी तशीच कर्मभूमी सुद्धा आहे. काना, मात्रा, आकार, उकार, वेलांट्या यांचा जरासुद्धा स्पर्श नसलेले हे नाव खरच मोठे अजब वाटते – पण ही माझी जन्मभूमी मला स्वर्गापेक्षाहि श्रेष्ठ वाटते. जगातील कुठल्याहि शहराच्या तुलनेत त्या शहराविषयी वाटणारा अभिमान, प्रेम अमर्याद आहे. अथांग आहे! ज्या भूमीवर माझा जन्म झाला, माझे पालन, पोषण शिक्षण झाले. जडणघडण झाली त्या अहमदनगरने मला सारं कांही भरभरुन दिलं आहे ! चारित्र्य संपन्न कुलवान घराण्यात जन्म, उत्तम संस्कार, उत्तम शिक्षण, अनेक पैलूंनी नटलेलं संपन्न व्यक्तिमत्त्व, जीवनाचा उत्कृष्ट आदर्श, अध्यात्माची आवड, त्याचे महत्त्व, भावपूर्ण प्रेमळ नातीगोती, आदरणीय गुरुजन, सुसंस्कृत आईवडील, बंधु–भगिनी अशी अनेक समर्थ वैशिष्ट्ये ! या सर्वांच्या आठवणी, या शहराशी जडलेले आपुलकीचे प्रेमाचे नाते ! या माझ्या प्रिय जन्मभूमीविषयी लिहितांना मन भरुन आले आहे ! किती लिहू आणि काय लिहू असे झाले आहे. सागरात उसळणाऱ्या लाटांसारख्या आठवणीच्या लाटा अंतकरणात उसळून येत आहेत. आठवणींचा सागर भरलेला आहे, खोल आहे, अथांग आहे !

एखाद्या चलत् चित्रपटासारखी असंख्य दृश्य डोळ्यापुढे वेगाने येत आहेत. बालपणी माझ्या मनावर झालेले माझ्या आईवडिलांचे संस्कार, त्यांच्या आठवणी, माझी ताई आजी, आक्कामावशी, सौ. वहिनी, दादामामा .... आजोळ घरच्या चिरस्मरणीय आठवणी आजही ताज्या आहेत. जणू कालच घडलेल्या आहेत. पहाटे बिछान्यात साखरझोपेत असताना ताईआजीच्या मंजूळ आवाजात गायलेल्या भूपाळीचे सूर कानावर पडायचे ! त्याच्या पार्श्वभूमीवर आक्कामावशीच्या मधूर आवाजातील नवनाथाच्या पोथीचे पठणही चालू असायचे. जागृती आली की माझ्या बाबांचे खड्या आवाजातील पुरुषसूक्त, श्रीसूक्त आणि रुद्रसूक्ताचे धीरगंभीर पठण कानावर यायचे. मग मी झटकन उठायची! हात जोडले जायचे जमिनीला नमस्कार करुन पादस्पर्श करायचा आणि मुखाने म्हणायचे, ‘कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये तू सरस्वति। करमूले तु गोविंदम् प्रभाते करदर्शनम् ।’ त्याचवेळी आईने स्टोव्ह पेटवलेला असायचा. दूध तापायला ठेवलेले असायचे – काम करता करता तिच्या मधुर आवाजातील जगदंबेची प्रार्थना कानावर यायची.

‘सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके । शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणी नमोस्तुते ।’

माझे वडील श्री. गोपाळ सोमनाथ देशपांडे यांनी नगरमध्ये वकिली क्षेत्रामध्ये सिनियर पोलीस प्रॉसिक्युटर म्हणून कार्य केले – वकिली क्षेत्रात खूप मोठे नाव मिळवले – इंग्रजी आणि संस्कृत भाषेवर त्यांचे फार मोठे प्रभुत्व होते – उत्तम इंग्रजी भाषेत केलेली त्यांची कोर्टामधील आर्ग्युमेंटस फार गाजत असत. या व्यवसायात पदार्पण करणाऱ्या नव्या तरुण वकीलांना त्यांचे फार मोठे मार्गदर्शन झाले. वडिलांच्या ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्वाचा मला खूप फायदा झाला. या दोनही भाषांची गोडी लहानपणापासूनच निर्माण झाली. वडिलांचा अध्यात्मिक संपन्नतेचा वारसा फार महान आहे. सर्व सूक्तांचे पठण, श्रीआद्य शंकराचार्यांची स्त्रोत्र, विशेषत: देवीक्षमापन स्तोत्र, शंकराचे मानसस्तोत्र आम्ही सर्व भावंडे आजही तेवढ्याच उत्साहाने म्हणत असतो.

माझ्या आईचे नाव कमला! नावाप्रमाणे सुंदर, मोहक व्यक्तिमत्व, सात्विक वृत्ती असलेली आमची आई, आमचे स्फूर्तीस्थान आहे. ती साक्षात् अन्नपूर्णा तर आहेच पण काव्यक्षेत्रातील आणि गाण्यातील तिला जाण रसिकवृत्ती आणि कौशल्य यांचा सुंदर वारसा आम्हाला लाभलेला आहे. माझे आजोळ घर पण अहमदनगरचेच ! माझे आजोबा (आईचे वडील) कै. बापूराव डावरे सोसायटी हायस्कूलचे हेडमास्तर ! त्यांचे शिस्तप्रिय संस्कार, नीटनेटकेपणा आजही जीवनात उपयोगी पडत आहे. आजोळमध्ये एकत्र कुटुंब व्यवस्था होती. शंभर माणसे एका घरात नांदतांना त्यांचे दैनंदिन जीवन अगदी जवळून पाहिले – त्या सर्वांमधून दर्शन घडले ते संपन्नता व समृद्धीचे ! आचार विचारांची सुसंस्कृत संहिता, भावनिक ओलावा, प्रेम, माया याची अनुभूती आईवडील आणि आजोळ घरी भरभरुन मिळाली.

आजोळी जायला फार आवडायचे. एकत्र कुटुंबात चुलत, मावस, आते, मामे भावंडांची संख्या मोठी असायची. एकत्र बसून आजोबांच्या समवेत जेवण करणे, निरनिराळ्या फळांचा आस्वाद घेणे, जेवतांना पैज लावून पोळी आमटीचा

काला संपवणे, गप्पा, चेष्टा, मस्करी, या सर्वांची नुसती रेलचेल असे. आमच्या चुलत आजोबांचे नाव 'गोविंद' असले तरी आम्ही त्यांना 'ॐ' म्हणत असू. त्यांच्याकडून निसर्गप्रेमाचे धडे मिळाले. त्यांनी लावलेल्या झाडांना पाणी घालण्याचा कार्यक्रम आनंदात चालायचा. गुलाबाची झाडे तरारली की सुंदर फुले यायची. दुसऱ्या दिवशी गुलाबी, लाल, पिवळ्या रंगांची टपोली फुले आजोबा ओट्यावर मांडायचे आणि शाळेत जातांना आम्हाला द्यायचे. त्यांच्या हातून ते फूल घेतांना मोठे बक्षिस घेतल्याचा आनंद व्हायचा. पण झाडाला पाणी घालायला विसरलो तर मात्र आमची सडकून हजेरी घ्यायचे. आमची कंबक्ती – त्यांचा राग, आरडाओरडा.... "माझी झाडे..... गरीब बिचारी झाडे" असे म्हणतांना डोळ्यात आलेले पाणी आजही आठवते ! झाडांवर एवढे विलक्षण प्रेम करणाऱ्या या अनेकांनी जीवनाकडे पाहण्याची एक सुंदर दृष्टीच दिली.....

आम्ही सर्व भावंडे नाटक करायचो, गाणी गायचो – नगरच्या भुईकोट किल्ल्याजवळ फिरायला जायचो, मैदानावर खेळायचो, लोणचे, गूळ तूप, पोळ्या घेऊन रविवारी पायी पायी चांदबिबीच्या महालावर जायचो. या सर्वांमध्ये ट्रेकींगच्या साहसाचा आनंद मिळायचा. खरंच आमचं लहानपण खऱ्या अर्थाने परिपूर्ण, संपन्न स्वरुपाचे होतं. नैसर्गिक जीवनाचा खराखुरा ओलावा, प्रेम आम्ही भरभरुन अनुभवलं. सर्वांना वाटले !

नवरात्राचे दिवस अतिशय संस्मरणीय असत ! नऊ दिवस पहाटे तीन वाजता आंघोळ करुन अंधारात पायात चप्पल न घालता भक्तिभावाने केडगावला देवीच्या दर्शनाला जातांना अनुभवलेले क्षण आजही अंगावर आनंदाचे रोमांच आणतात! आमच्या उत्साही मामी म्हणजे सुमतीमामी आणि रजनीमामी ! त्यांच्या समवेत आम्ही सर्व बालगोपाळ मंडळी अगदी उड्या मारत देवीला जायचो! देवीचे दर्शन करुन सहा वाजता परत येणे ! जातांना आकाशातील चंद्र, चांदण्या, ताऱ्यांचे वैभव पहाणे, गाणी म्हणणे यात रस्ता कसा संपायचा ते कळायचे पण नाही! सकाळी आणि रात्री नवरात्रातील देवीच्या आरत्या अगदी देवीशी एकरुप होऊन तन्मयतेने आम्ही म्हणत असू! देवीच्या देवळात बसून लिहिलेल्या गोष्टी, व्यंकटेश स्तोत्रांच्या हस्तलिखित पोथ्या लिहिणे अशाही स्वरुपाचे उपक्रम आम्ही केले.दिवाळीच्या वेळी अभ्यंगस्नान हा एक असाच आनंदमय आठवणीचा भाग ! आमच्या उत्साही मामींनी आम्हाला तेलमॉलिश करुन स्नान घालायचे ! सुगंधी उटणी, तेल यांची नुसती रेलचेल ! त्या सुगंधी उटण्याचा वास आजही नाकात दरवळतो ! फटाक्यांची जुगलबंदी, भुर्नळ्यांची आतषबाजी लवंगी मिरच्या, साप, करंज्या करणे, अनारसे करणे, चकल्या एकत्र बसून करणे, तळणे आणि नरक चतुर्दशीच्या दिवशी अभ्यंग स्नान झाल्यावर चवीने स्पर्धा लावून खाणे ... हे सर्व आनंद, हे सर्व अनुभव अगदी शुद्ध, निरागस आणि सात्विक स्वरुपाचे होते. आज मनात येते की इतकी सुंदर लहानपण, इतकं समृद्ध बालपण अनुभवणारी आम्ही सर्व चुलत, आते भाऊ बहिणी खरंच फार भाग्यवान आहोत !

पहाटे केलेले आवळी भोजन, पारिजातकाच्या झाडाला लावलेली चांदण्यांची फुले त्यांचा पडलेला सडा.... त्या पारिजातकाच्या फुलांचा सुगंध आजही अगदी तसाच दरवळतो! नुसती आठवण झाली तरी सुगंध जाणवतो ! मन मोहरुन जातं! हर्षानं फुलून येतं ! ओसरीवर माझी ताईआजी भलीमोठी रवी खांबाला दोरीने बांधून ताक घुसळायला लागली की आम्ही सारे तिच्या भोवती कडे करुन उभे रहायचो आणि लोण्याचा गोळा कधी हातावर पडेल याची वाट पहायचो! ती पण आमच्याकडे मिस्किलपणे पाहून न पाह्यल्यासारखे करायची आणि गाणी म्हणत म्हणत ताक घुसळत राहायची ! मग मात्र आमच्या मागण्या जोरदार सुरु व्हायच्या ..... गाणे थांबवून तिने लोण्याचा गोळा हातावर ठेवला की अगदी बोटे चाटत ते लोणी मटकावून टाकायचे ! त्या क्षणाला आम्ही सारे श्रीकृष्णाचेच अवतार होऊन जायचो..

आक्कामावशीच्या सान्निध्यात तर आम्ही सर्वार्थाने पूर्णत्व मिळवले – ती स्वत: शाळेची हेडमिस्ट्रेस होती! तिच्या बरोबर टांग्यातून शाळेत जाणे म्हणजे व्हिक्टोरियात बसून ऐटीत मिरवणे ! शिक्षणाची आवड, वाचनाची आवड तिच्यामुळे जास्त फुलली ! देवपूजा करतांना, नवनाथाची पोथी वाचतांना ती तन्मयतेने, श्रद्धेने त्यात रंगून जायची ! आजही तिचा तो तेजस्वी चेहरा डोळ्यापुढून हालत नाही !

सुमतीमामींच्या बरोबर सर्जेपूरा मारुतीसमोर भरणाऱ्या 'पचंब्याला' जाण्याचा आनंद म्हणजे, आमचा अगदी पर्वणीचा काळ असे! नगरमध्ये भरणारा 'पचंबा' आम्ही दरवर्षी नव्याने अनुभवायचो ! प्रत्येकाला चार आणे मामी द्यायच्या. मग त्या चार आण्याच्या बजेटमध्ये आमची खरेदी काय असायची ! मुली बाज, पाळणा आणि लाकडाच्या ठक्या (बाहुल्या) घ्यायच्या ! त्या ठक्या फार मस्त रंगवलेल्या असायच्या, मग त्या ठक्यांची, भावला भावलींची लग्ने लावणे, मंगलाष्टके म्हणणे, दाण्याचे लाडू वाटणे. नुसती धम्माल चालायची. मुले मात्र रंगीबेरंगी काचेच्या गोट्या नाहीतर विटीदांडू

घेत असत ! नगरच्या पचंब्याच्या आठवणी फार रंगीबेरंगी आहेत. आज हे पचंबे अदृश्य झाले आहेत ! त्यांची जागा स्टॉल्सनी घेतली आहे !

माझ्या दादामामांकडून आणि वडिलांकडून वाचनाची आवड निर्माण झाली ! दादामामांच्या खोलीत भरपूर पुस्तके, मासिके असत. ते पण भिंगार हायस्कूलचे मुख्याध्यापक होते. मुलांनी भरपूर वाचावे असे त्यांना वाटायचे. त्यामुळे त्या पुस्तकांचे वाचन करणारे भाचे, भाच्या, पुतणे यांना त्यांनी सदैव प्रोत्साहन दिले ! श्री. नागेश मामांच्या मुळे गाण्याची, फोटोग्राफीची, नाटकांची देणगी मिळाली ! बाबामामांच्या कडून शरीरसौष्ठवाचे, शरीरसंपदा उत्तम कशी टिकवावी याचे बाळकडू मिळाले – व्यायामाचे महत्त्व समजले.

शालेय शिक्षण सोसायटी हायस्कूलमध्ये झाले. अतिशय हुषार, ज्ञानवंत गुरुजन लाभले. कै. खं.के.क्षीरसागर मुख्याध्यापक असतांनाची आठवण म्हणजे वक्तशीरपणा व आदर्श संस्कार. सकाळी ११ वाजता ते पायी चालत शाळेकडे निघाले म्हणजे सर्वांनी आपापली घड्याळे त्यावेळेला लावायची ! घड्याळ चुकेल पण खं.के.क्षीरसागराची व शाळेत जाण्याची वेळ कधी चुकलीनाही. इतिहास विषय शिकवतांना एरवी करडा शिस्तबद्ध चेहरा असलेले सर त्यात इतके रंगून जात असत की एक मूर्तिमंत नाट्य, अभिनिवेश त्यांच्या अंगातून व्यक्त होऊ लागे. अफझलखानाचा वध शिवाजीने कसा केला याचे रोमांचकारी वर्णन त्यांच्या तोंडून ऐकतांना आमचे भान हरपत असे. ऋषी सर, फडके सर यांनी संस्कृतचे धडे अगदी पक्के गिरवून घेतले. सौ. शकुंतला रानडे बाईंनी भूगोल इतका सुंदर शिकवला की पृथ्वीचा गोल, विषववृत्त, उष्ण प्रदेश, समशीतोष्ण प्रदेश, थंड प्रदेशाच्या जागा दाखवणारे नकाशे जसेच्या तसे डोळ्यापुढे येतात. भाटे सरांनी हिंदी भाषेची गोडी, नजाकत कशी घ्यावी याचे अनेक आदर्श वस्तुपाठ दिले. तर अं.ज.घारे सरांनी चित्रकला विषयात विविध रंगांच्या दुनियेत आपले कौशल्य कसे दाखवावे याचे उत्कृष्ट मार्गदर्शन केले. देवस्थळी सरांकडून नाट्यकलेचे धडे मिळाले. त्यामुळे शाळेच्या स्नेहसंमेलनामध्ये नाटकात काम करण्याचा आनंद लुटता आला. अभ्यासाबरोबर खेळ, नाट्य, गायन या सर्व क्षेत्रात अगदी मनसोक्त आनंद लुटण्याची संधी वारंवार मिळत गेली. मोने कलामंदिराच्या स्टेजवर 'विदुषी', 'सत्तेचे गुलाम' अशा नाटकात काम करण्याची संधी मिळाली.

अहमदनगर कॉलेजमधील मोरपंखी दिवसांच्या सुंदर आठवणी असंख्य आहेत. मध्यंतरी अमेरिकेत शिकागोला जाण्याचा प्रसंग आला. त्यावेळी कॉलेजचे प्रिन्सिपॉल श्री. थॉमस बार्नबस यांना आवर्जून भेटले. त्या एका तासाच्या भेटीत असंख्य विषय रंगले. "आपल्या आयुष्यातील उत्तम दिवस म्हणजे नगर कॉलेजमधील दिवस आहेत" असे म्हणताना सरांचा फुललेला चेहरा सतत डोळ्यापुढे येतो – प्रो. घासकडबींनी उत्तम इंग्रजी शिकवले. कॉलेजमधील चर्चच्या पायऱ्यांवर बसून प्रा. विमला भगत यांनी शिकवलेले Paradise Lost, Merchant of Venice, As You Like it आजही अंगावर रोमांच निर्माण करतात. प्रा. जोशी, प्रा. खरवंडीकर, प्रा. बोपर्डीकर यांनी संस्कृत साहित्य, संस्कृत व्याकरण, भगवदगीतेचे यथार्थ दर्शन घडवले. अभ्यास मन लावून केला तसे खेळांतपण मनापासून रमण्याची संधी लाभली. टेबल टेनिस, बॅडमिंटनच्या इंटरकॉलेजिएट सामन्यांत शर्थीने लढती दिल्या. मॅचेस जिंकलो. मॅचेस हरलो पण स्पोर्टस्मन स्पिरिट कधी गमावले नाही ! प्रो. चांदोरकर सरांकडून टेबल टेनिसचे जे प्रशिक्षण मिळाले; ते एवढे उत्कृष्ट होते की आजही त्यांनी शिकवलेले बारकावे, Offence-Defence च्या पद्धती जशाच्या तशा लक्षात आहेत. मी अजूनही टेबल टेनिस मोठ्या उत्साहाने खेळते – त्याच्या जोडीला कॉलेजमध्ये होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धा, नाट्या स्पर्धा, गायन स्पर्धात मनसोक्त भाग घेतला. खऱ्या अर्थाने व्यक्तिमत्व फुलविण्याची संधी अहमदनगर कॉलेजमध्ये मिळाली ! लायब्ररीत बसून वाचलेली उत्तमोत्तम पुस्तके, शेक्सपीयरची नाटके, डॉन्टेची Divine Comedy यांचा आनंद भरभरुन घेतला.

'अहमदनगर' हे नाव नुसती जन्मभूतीच नाहीतर माझी कर्मभूमी पण आहे – ग्रॅज्युएट झाल्यानंतर सोसायटी हायस्कूलमध्ये संस्कृत शिकविण्याची संधी मिळाली. ज्या शाळेत आपण शिकलो त्याच शाळेत टिचर म्हणून काम करताना मला फार अभिमान वाटला. तो माझा खराखुरा prestige point होता. पुढे आयुष्यात मोठ मोठ्या कॉलेजेसमध्ये प्राध्यापक म्हणून अनेक वर्ष काम केले. इंग्रजी विषय जवळ जवळ ३० वर्ष शिकवला. पण सोसायटी हायस्कूलमध्ये संस्कृत विषय शिकवण्याचा आनंद काही निराळाच होता.

Personality Development व्याख्या म्हणजे "Personality is the sum total of an individual's physical] intellectual moral, social, emotional and cultural development"

अहमदनगरसारख्या जन्मभूमीने, कर्मभूमीने आपल्या व्यक्तिमत्वाला सर्वार्थाने असे संपन्न बनवले आहे अशी माझी श्रद्धा आहे धारणा आहे. अहमदनगर या नावातील प्रत्येक शब्दात काही खास वैशिष्ट्ये आहेत.

'अ' म्हणजे अस्मिता, अस्तित्व, अभिरुची !

'ह' म्हणजे हसतमुख स्वभाव, हर्ष, हरहुन्नरी व्यक्तिमत्व.

'म' म्हणजे मधुरता, मनोबल, मार्दव, मनमोकळेपणा, ममता.

'द' म्हणजे दया, दान, दिलदार वृत्ती, दूरदर्शीपणा.

'न' चा अर्थ – नम्रता, निर्व्याजता, निरलसपणा, निस्वार्थीपणा.

'ग' चा अर्थ – गुणग्राहकता, गौरव, गेयता, गृहदक्षत्व, गुरुकृपा.

आणि

'र' म्हणजे रसिकता, रमणीयता, रसपूर्णता, रसरशीतपणा, रसास्वाद घेण्याची वृत्ती....!!

अहमदनगर जिल्ह्यामध्ये अध्यात्मिक संस्कृती प्रकर्षाने जागृत आहे. स्थित आहे – नगरपासून चाळीस मैलावर असलेल्या श्री वृद्धेश्वर क्षेत्राला माझ्या वडिलांच्या बरोबर जाण्याची संधी अनेकवेळा मिळाली. पैठण ते वृद्धेश्वर अशी पदयात्रा त्यांनी बावीस वर्षे अखंड सातत्याने केली. महाशिवरात्रीला त्यांनी खड्या आवाजात केलेल्या रुद्र पठणाने गाभाऱ्यामध्ये प्रचंड चैतन्य ! भक्तीभाव जागृत होई. त्यांच्या चेहऱ्यावर फुललेली भक्तिभाव, रुद्राचे तेजस्वी, ओजस्वी दर्शन मी अगदी जवळून पाहिले ! आज या रुद्राचे पठण करतांना माझ्या बाबांचे संस्कृत शुद्ध स्वर, लयबद्ध आवाज मला सतत अंतर्मनात साथ देतात. मार्गदर्शन करतात !

तसेच 'रामनवमीला' शिर्डी येथे होणारा सोहळा हा सुद्धा फार आनंदाचा भाग आहे. श्री साईबाबांनी माझे पणजोबा श्री. शंकर रघुनाथ देशपांडे–निमोणकर (कै. नानासाहेब निमोणकर) यांना 'रामनवमी' च्या दिवशी द्वारकामाईवर (मशिदीवर) 'निशाण' (ध्वज) लावण्याची आज्ञा केली. या घटनेला जवळ जवळ ११० वर्षे झाली. एवढी वर्षे देशपांडे – निमोणकर घराण्यातील सर्व व्यक्तींनी ही प्रथम आज्ञा निष्ठेने पाळली आहे.  दरवर्षी नवे निशाण शिवायचे. श्रीसाईबाबाच्या समाधीवर त्याची पूजा करायची आणि मोठ्या सन्मानाने रथयात्रेबरोबर त्यांची मिरवणूक काढून ते द्वारकामाईवर सतत फडकत ठेवायचे. हा उपक्रम गेली ११० वर्षे अव्याहत चालला उत्साहाने त्यात सहभागी व्हायचे. आजहि हे कार्य करीत आहोत. आमच्या आईबाबांच्या बरोबर लहानपणी अनेक वेळा शिर्डी येथे होणाऱ्या या सोहळ्यात सामील झालो. आजहि नियमित जात आहोत. 'श्रीसाईकृपेचा हा प्रचंड अध्यात्मिक वारसा' आम्ही प्राणपणाने जपलेला आहे. कै. नानासाहेब निमोणकर संगमनेर येथे ब्रिटिशांच्या काळात 'ऑनररी मॅजिस्ट्रेट' होते. पण श्रीसाईबाबांच्या सहवासात आल्यावर आपल्या सर्व सन्माननीय पदाचा त्याग करुन ते आपल्या पत्नीसह श्रीसाईबाबांच्या सेवेत रुजू झाले – श्रीसाईबाबांनी देह ठेवल्यानंतर नानासाहेबांनी पण तीन महिन्याच्या आतच देह ठेवला. ते संपूर्ण साईमय झाले होते. श्रीसाईबाबांच्या अनेक आठवणी माझ्या बाबांच्या मुखातून आम्ही ऐकल्या आहेत. आमच्या जीवनात श्रीसाईबाबांची कृपा, त्यांचा आशीर्वाद आजही मार्गदर्शन करीत आहेत. ते संस्कार फार बहुमोल आहेत. शाश्वत आहेत.

माझे जीवन सर्वार्थाने घडवणारे असे हे अहमदनगर !

कानामात्रा, आकार, उकार नसलेले हे शब्द किती अर्थपूर्ण आहेत ! एकापेक्षा एक श्रेष्ठ गुण, श्रेष्ठ दर्जाचे अनुभव या गावाने अनेक व्यक्तींना बहाल केले आहेत. या गावातून बाहेर गेलेल्या व्यक्तींनी आपल्या देशात, परदेशातील अनेक देशांमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे. आपल्या उत्तम अभिरुची संपन्न व्यक्तिमत्वाचे ठसे उमटवले आहेत ! अशा या माझ्या जन्मभूमीचा, कर्मभूमीचा मला फार अभिमान आहे. तिचा 'संपन्न' वारसा चालविण्याची संधी आयुष्यात मला अनेकदा लाभली आहे. या सर्व आठवणी म्हणजे माझ्या हृदयाच्या मर्मबंधातील जपलेला बहुमोल ठेवीसारख्या आहेत. त्यांचा ताजेपणा, त्यांचा सुवास सदैव माझ्या अंत:करणात, दरवळत असतो. यशस्वी जीवनात जगण्याचा संजीवन मंत्र, अमोघ शक्ती यापासून मिळाली.

सुप्रसिद्ध इंग्रजकवी वर्डस्वर्थने मनाच्या एकाकी अवस्थेत भटकत असतांना समुद्रकिनाऱ्यावर डोलणारी असंख्य, 'डॅफोडिल्स'ची फुले पाहिली. सूर्याच्या प्रकाशात नाचणारी, डुलणारी ती पिवळी सुंदर फुले त्याच्या आयुष्यात चिरंतन आनंद देणाऱ्या खजिन्याप्रमाणे ठरली. तशाच 'अहमदनगर'च्या सुंदर आठवणी या Golden Daffodils सारख्या माझ्या मनात

**सदैव टवटवीत आहेत. ताज्या आहेत – त्यांचे महत्व आज माझ्या जीवनात काय आहे? जेव्हा मी एकटी असते, तेव्हा त्या आठवणी माझा मूड बदलून टाकतात, एक नवे चैतन्य सळसळू लागते. आनंदाचे झरे खळखळ वाहू लागतात. तो माझा अमोल खजिना आहे?**

For oft upon my coach I lie.
They flash upon my inward eye
Which is the Bliss of Solitude.......!!

**(स्नेहांकुर – दिवाळी अंक)**